


# गोष्ट मधमाश्यांच्या पोळ्याची...



**सुनील पाटील**
(मो.नं. ९८२२३११२१४)
१४, चंपापुरी अपार्टमेंट, गोरक्षनगर,
दिंडोरी रोड, नाशिक

**शत्रू लाखोंची फौज घेऊन चाल करून आलेला आणि आपल्याकडे मात्र मूठभर सैन्य अशी स्थिती. आता शरणागती पत्करून तह केल्याशिवाय पर्याय नाही असा विचार केला. मित्रमंडळी, नातेवाईक यांच्याशी फोनवर चर्चा झडू लागल्या. देशाच्या आर्थिक संकटापेक्षा मधमाश्यांची विल्हेवाट हा आमच्या दृष्टीने अत्यंत ज्वलंत प्रश्न झाला...**

**सा**धारणत: तीन- चार वर्षांपूर्वी घडलेली ही घटना. आमचं छोटंसं त्रिकोणी कुटुंब. मुलगी, बायको आणि मी. दिवाळीची सुट्टी सुरू होण्यापूर्वी मुलीने सांगितलं, ''आई- बाबा, मी आपल्या बेडरूमच्या बाल्कनीत मधमाश्या उडताना बघितल्या.'' कामाची गडबड असल्यामुळे आम्ही दोघांनी तिचं बोलणं फारसं काही मनावर घेतलं नाही. सुटीच्या पहिल्याच दिवशी मात्र मधमाश्यांचा वावर चाललेला दिसला. आम्हाला कळेना एवढ्या माश्या कुठून आणि का येतायत? त्यांनी पोळं बनवायची जागा निश्चित केलेली असून, आणि बनवायला सुरवातही केलेली असावी याची पुसटशीही कल्पना आम्हाला आली नाही. माश्या कमी आहेत पाहून आम्ही थोडंसं दुर्लक्ष केलं.




दोन दिवसांनी बायकोने घर आवरायला काढलं. बाल्कनीतलं एक जुनं लाकडी कपाट तिच्या एकटीकडून हलणं शक्य नव्हतं, म्हणून मी मदत करायला उठलो. कपाट थोडंसं हलवलं आणि काही मधमाश्या बाल्कनीत गूंऽऽ गूंऽऽ करू लागल्या. आम्ही दोघेही जरा घाबरलो. मधमाश्या कडकडून नांगी मारतात आणि वेदना फार वेळ होतात, हे शालेय जीवनात अनुभवलेले होते. कपाटाच्या मागे पाहतोय तर काय हजारो मधमाश्यांची फौज पोळं बांधण्याचं काम शांतपणे करत होती. आम्ही दोघेही उडालोच! मुलगी मात्र एकदम खुश! पोळं जवळून बघायला मिळणार याचा तिला आनंद. आमच्या दोघांच्या डोक्यात मात्र एकच प्रश्न- आता यांची विल्हेवाट लावायची कशी?

शत्रू लाखोंची फौज घेऊन चाल करून आलेला आणि आपल्याकडे मात्र मूठभर सैन्य अशी स्थिती. आता शरणागती पत्करून तह केल्याशिवाय पर्याय नाही असा विचार केला. मित्रमंडळी, नातेवाईक यांच्याशी फोनवर चर्चा झडू लागल्या. देशाच्या आर्थिक संकटापेक्षा मधमाश्यांची विल्हेवाट हा आमच्या दृष्टीने अत्यंत

ज्वलंत प्रश्न झाला. शेजारी पाजारीही बैठका, चर्चा सुरू झाल्या. कुणी म्हणत होतं- धूर करा, कुणी सुचवत होतं की जाळ करा, कुणी सल्ला दिला की पेस्ट कंट्रोलवाल्यांना बोलवा. सोसायटीतल्या काही लोकांचं मत होतं की अग्निशमन दलाला कळवा. सोसायटीतली शाळकरी मंडळी म्हणायला लागली, आम्ही दगड मारून त्यांना पळवू शकतो. सोसायटीतील बायकांची कुजबूज कानावर येऊ लागली की- किती आळशी हे लोक! आम्हाला- आमच्या कुटुंबाला या मधमाश्यांपासून धोका आहे! आमचे शेजारचे (नुकतेच आई-बाबा झालेले) जोडपे अतिशयोक्तीचा कळस गाठत म्हणाले, ''आमच्या बाळाला या मधमाश्यांनी उचलून नेले तर?''

बायकोच्या माहेरच्यांविरुध्द आपण काहीतरी बोलावे आणि तिने ते फारच मनाला लावून घ्यावे, तसे तिने मधमाश्या प्रकरण मनाला लावून घेतले. ती डाफरली आणि मला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून बोलू लागली- ''घरकामात कधी मदत करायला नको. सगळीकडे मी एकटीच मरमर मरते. नोकरी सांभाळा, घर सांभाळा, तुमचे नातेवाईक सांभाळा, तुमचे दोघांचे चोचले पुरवा...'' असे बरेच काही! निष्कर्ष एकच- मी वेळोवेळी मदत केली असती तर मधमाश्यांनी पोळे केलेच नसते.



बाल्कनीत जशी मधमाश्यांची गूंऽऽ गूंऽऽ तशी घरात बायकोची भुणभुण सुरू झाली. सोसायटीत दोन किंवा अधिक लोकांचा समूह बोलताना दिसला की वाटायचं ते आपल्याविषयीच बोलतायत. रस्त्याने जाणारे येणारे थोडावेळ थांबून, बाल्कनीकडे बघू लागले. बोट दाखवून सोबतच्या लोकांना पोळं दाखवायचे. आपली बाल्कनी ही नेमकी कुतुहलाचा विषय झाली की निर्भर्त्सनेचा हे आम्हाला कळत नव्हतं!

एकाही मधमाशीने अजूनपर्यंत कुणालाच नांगी मारली नव्हती. परंतु घरात बायको आणि बाहेर लोक मला शाब्दिक नांग्या मात्र मारत होते. शाळेत शिकलेलं आठवत होतं की मधमाशी फक्त एकदाच नांगी मारू शकते. कारण नांगी तुटल्यानंतर अल्पावधीतच तिचा मृत्यू होतो. (समोरील व्यक्तीला शाब्दिक डंख मारणाऱ्या मनुष्यप्राण्याला मधमाशीसारखा मृत्यू आला तर? अशी कल्पनाही करता येणार नाही; मात्र विषारी बोलल्यानंतर त्याची जीभ गळून पडली असती तर? काय गोड बोलली असती माणसं एकमेकांशी!)

बाल्कनीतील या मधमाशी प्रकरणाचा कायमचा निकाल लावायचा, असं माझं आणि बायकोचं ठरलं. पेस्ट कंट्रोलवाल्याला फोन केला असता पंधराशे रुपये घेईन, असे त्याने सांगितले. आम्ही तयार झालो आणि दुसऱ्या दिवशी सकाळी तो येणार असल्याचे त्याने सांगितले. हे सगळं सुरू असताना आमची मुलगी मात्र शांत होती. तिचा सक्रिय सहभाग नव्हता किंवा मोठ्या युध्दात छोट्या सैनिकाचे काय काम? या प्रकारे तिला अलिप्तच ठेवलं. थोड्या वेळाने ती हळूच जवळ येऊन बोलली, ''त्यांना आपण वाचवू शकतो का?'' म्हणजे कोणी मधमाशी पालन करते का? तिच्या या शंकेनंतर लक्षात आले की या बाजूने आम्ही विचारच केला नव्हता.

मग मधमाशी पालकाचा शोध सुरू केल्यावर कळले की आपल्याच शहरात एक निवृत्त प्राध्यापक आहेत, ते मधमाशी पालन करतात. त्यांची टीम येऊन पोळे सुरक्षितपणे काढते आणि त्यांच्या शेतावर स्थलांतरित करते. या सर्व कामाचे ते तीन हजार रुपये घेतात. म्हणजे मधमाश्यांचा जीव वाचवण्याचे तीन हजार आणि जीवे मारण्याचे पंधराशे रुपये. आम्ही विचार करू लागलो, जगात 'जीव वाचवण्यापेक्षा' 'जीव घेणं' किती स्वस्त झालंय!

मी त्या प्राध्यापकांना फोन केला. त्यांनी मधमाश्यांच्या पोळ्याचे फोटो मागवले. त्यांना फोटो व्हॉट्स ॲप केले. थोड्या वेळाने त्यांचाच फोन आला आणि त्यांनी सांगितले की काही अडचण नसल्यास, काही दिवस बाल्कनी बंद ठेवा. त्या मधमाश्या त्रासदायक नाहीत. त्यांच्या कामात अडथळा आणला तरच त्या आपल्यावर हल्ला करतात. ते सांगत होते की, सर्वसाधारणपणे हिवाळ्याच्या शेवटी अथवा

उन्हाळ्याच्या प्रारंभी राणीमाशी पोळ्यातून बाहेर येते. तिच्याबरोबर अनेक कामकरी माश्या व नरमाश्या झुंडीने बाहेर येतात. यालाच मोहोळ उठणे म्हणतात. त्यानंतर ते रिकामे पोळे काढून ती जागा स्वच्छ करून घ्यायला त्यांनी सांगितले. पुन्हा मधमाश्या त्या जागेवर येणार नाहीत. कुठल्याच प्रकारचा खर्च करायची गरज नाही.

मुलगी खुश झाली. बायकोलाही पटलं. शिक्षकही हळवे असतात. पेस्ट कंट्रोलवाल्याला नकाराचा निरोप दिला. प्रश्न होता फक्त सोसायटीतील लोकांचा. या विषयावर सोसायटीची मीटिंग ठरली होती चार दिवसांनंतर. आमच्याकडे चार दिवस होते. मग सुरू झाला मधमाश्यांवर अभ्यास आणि वाचन. अल्बर्ट आईन्स्टाईन म्हणतात, ''जगाच्या पाठीवरून मधमाश्या नाहीशा झाल्या तर माणूस जेमतेम चारच वर्षे जगू शकेल.'' हे वाचल्यानंतर माझी झोपच उडाली. किती मोठी चूक करण्यापासून आपण थांबलो!

दोन दिवसांत बरीच माहिती वाचून झाली. राणीमाशी, कामकरी माशी हे प्रकारही कळले. पोळे तयार करणे, मध, मकरंद व पराग जमा करणे आणि हे करत असतानाच परपरागण करणे, डिंभांना–राणीमाशीला अन्न देणे व पोळ्याची निगा राखणे ही कामे कामकरी माश्या करतात. यांनाही चांगली वाढ झालेली काटेरी नांगी असते आणि तिचा उपयोग त्या पोळ्याच्या व त्यांच्या समूहाच्या संरक्षणाकरिता करतात. मृत मधमाश्या पोळ्यातून बाहेर काढून दूर टाकून देण्याचे महत्त्वाचे कार्यही काही कामकरी माश्या करतात. यामुळे मृत मधमाश्या पोळ्यात साठत नाहीत आणि त्यांच्यामुळे उद्‌भवणारे रोग व आकर्षित होणारे अपायकारक कीटक वा इतर जीवजंतू यांपासून पोळ्याचे संरक्षण होते. निसर्ग किती परिपूर्ण आहे! माझ्या लक्षात आलं की आपण निसर्ग समजून घेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्नच कधी करत नाही.

मुलीसोबत हॉलिवूडचा 'बी' हा ॲनिमेटेड चित्रपट पाहिला. मधमाश्यांनी काम बंद केले तर सृष्टी कशी ओसाड होईल हे ऐकूणच आपण सुन्न होतो. मध, मेण या दोन वस्तूंच्या उत्पन्नाच्या दृष्टीने मधमाश्यांचे फार महत्त्व आहे पण याहीपेक्षा कृषिक्षेत्रात परपरागीभवन हे मधमाश्यांचे फार महत्त्वाचे कार्य आहे. या क्रियेचे दूरगामी परिणाम फार व्यापक स्वरुपाचे आहेत. अनेक पिके ही परपरागीभवनावर अवलंबून असतात. जोपर्यंत मधमाशी त्यांचे परागीभवन करून देत नाही तोपर्यंत फळ तयार होणे अशक्य असते. पुष्कळ फळझाडांची फुले या क्रियेने फलित झाल्यावर उत्तम फळे देतात. इतक्या मोठ्या प्रमाणावर सध्यातरी परपरागणाचा दुसरा मार्ग ज्ञात नाही.

असं म्हणतात की, आपण जितक्या प्रकारची शेती उत्पादने घेत असतो त्यातील एक तृतियांश उत्पादने ही मधमाशीमुळे मिळत असतात. माहिती वाचून मी अवाक् होत होतो आणि माझी मानही शरमेने खाली झुकत होती. कारण माणूस म्हणून निसर्गासाठी आपण काय करतो, याचं समाधानकारक उत्तर मिळत नव्हतं.

मोबाईल टॉवर्समधून निघणाऱ्या विद्युतचुंबकीय लहरी हे मधमाश्यांची संख्या कमी होण्यामागील प्रमुख कारण मानले जाते. विद्युतचुंबकीय लहरी मधमाश्यांच्या शरीरात असलेल्या 'चुंबकीय रडार'वर परिणाम करतात. त्यामुळे दिशाहीन झालेल्या माश्या गोंधळून जातात व पोळ्यापर्यंत पोहोचत नाहीत. म्हणजे आपल्यापासून त्यांना धोका आहे.

मधमाश्यांबद्दलची एवढी भीती आपल्या मनात लहानपणापासून बिंबवलेली असते की त्यांना पाहूनच त्यांना मारण्याचा विचार आपल्या डोक्यात येतो. सोसायटीच्या मीटिंगमध्ये वाचलेली माहिती दिली. त्यांनाही माझं म्हणणं पटलं. मधमाशी प्रकरण अशा पध्दतीने नाजूकपणे हाताळलं गेलं.

मधमाश्या मात्र खूप महत्त्वाचा संदेश देऊन गेल्या. आपल्याबरोबर निसर्ग वेगवेगळे प्रसंग घडवून आणतो. माणूस म्हणून आपल्या हातात असते, प्रतिकार करणे किंवा प्रतिसाद देणे! साधारणपणे मार्चच्या पहिल्या आठवड्यात मधमाश्यांचा वावर कमी झाला आणि हळूहळू बंद झाला. आम्ही ते रिकामं पोळं काढून घेतलं. कपाटही काढून घेतलं. आजही त्या बाल्कनीत उभे राहताना आम्ही आनंदी असतो. आम्ही त्या बाल्कनीकडे एक प्रेक्षणीय स्थळ, मधमाश्या संवर्धन ठिकाण म्हणून अभिमानाने बघतो.

–आजही मधमाश्या पोळे बनवतात म्हणजेच निसर्ग समृध्द आहे. आपण सुरक्षित आहोत. यापेक्षा अधिक काय हवंय? ■